Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… Date: 29/09/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com

जनतेवर सोडू नये, कारण त्याचा काहीही उपयोग होत नाही, हे पुन्हा पुन्हा सिद्ध झाले आहे. | लागेल. क्रूर दुर्घटने

# दिनविशेष



## मुस्लीम समाजसुधारक हमीद दलवाई

हमीद उमर दलवाई हे मुस्लीम समाजसुधारक व मराठी साहित्यिक होते. त्यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण तालुक्यातील मिरजोळी या गावी झाला. दलवाई यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूणमध्ये तर पुढील शिक्षण मुंबईत रुपारेल व इस्माईल युसुफ या महाविद्यालयांमध्ये झाले. हमीद यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रभावामुळे संघटनेची स्थापना केली. मुस्लीम महिलांचे प्रश्न, शिक्षणाचा अभाव आणि अंधश्रद्धा याबद्दल कोणीच बोलत नाही. या प्रेरणेतून दलवाई यांच्यातील सुधारक जागा झाला आणि १८ एप्रिल १९६६ रोजी त्यांनी मुस्लीम महिलांचा मोर्चा मुंबई विधानसभेवर काढला. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याची, समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याची मागणी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडे केली.

मुस्लीम महिलांनी त्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी काढलेला हा पहिला मोर्चा होता. दरम्यान, दलवाई यांची महाराष्ट्रातील बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंतांशी मैत्री झाली. त्यात अ. भि. शहांची मैत्री महत्वपूर्ण मानली जाते. त्यांच्या पुढाकारातून १९६८ मध्ये 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना झाली. सेक्युलॅरिझम, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मवादी राजकारण, परंपरा-अंधश्रद्धा अशा विषयावर मूलभूत मांडणी आणि योगदान देणारी ही संस्था बुद्धिजीवी तसेच सामान्य मुस्लिमांपर्यंत पोहोचू शकत नाही हे लक्षात आले. हा विचार मुस्लीम समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने समतावादी मित्रांशी चर्चा करून २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. समाज प्रबोधनाच्या संतुलित विकासात मुस्लीम समाजानेसुद्धा योगदान दिले पाहिजे हा यामागील उद्देश होता. हमीद दलवाई हे स्पष्ट भूमिका घेणारे कृतीशील विचारवंत होते. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही दोन मूल्ये दलवाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी होती. परंपरावादाला नकार आणि ऐहिकतेचा स्वीकार यांचा पुरस्कार करणाऱ्या हमीद दलवाईंना भारतीय समाजात मानाचे स्थान आहे. अशा पुरोगामी समाजसुधारकाचे ३ मे १९७७ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Sep 29, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401